उपआयुक्त, परिमंडळ विभाग क्र.३
पुणे महानगरपालिका, शिवाजीराव ढेरेउद्योग भवन
दुसरा मजला टिळकरोड, पुणे-२
जावक क्र.: ९०६
दिनांक : १९/०५/२०२६

मा. जाहिरात व्यवस्थापक,

**दै.महाराष्ट्र टाईम्स /दै.हमारा महानगर**

यांसी........

विषय : **जाहिरात प्रसिध्द करणे बाबत..**

सोबतची जाहिरात दिनांक २०/०५/२०२६ च्या अंकात एकवेळ कमीतकमी जागेत शासकीय दराने प्रसिध्द करावी व त्याअंकातील जाहिरातीची एक प्रत आमच्या उपआयुक्त परिमंडळ क्र .३ कार्यालयाकडे पाठवावी अशी विनंतीआहे.

जाहिराती मध्ये डाव्या कोप-यात पुणे महानगरपालिकेचे बोधचिन्ह प्रसिध्द करावे अशी विनंती आहे.

कळावे.

प्रशासन अधिकारी
परिमंडळ क्र.३
पुणे महानगरपालिका, पुणे

**टिप-सदरच्या जाहिरातीचे बिल त्वरीत उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.३ कडे सादर करावे. अन्यथा बिल अदा करणेस विलंब झाल्यास महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही.**

सोबत : परिमंडळ विभाग क्र.३ जाहिरात क्र. **06-DC-3-2026-27**

दिनांक : १९/०५/२०२६

# शुध्दिपत्रक

**उप आयुक्त परिमंडळ क्र.३ , पुणे महानगरपालिका**

उप आयुक्त परिमंडळ क्र.३ कडील दि.१२/०५/२०२६ रोजी दै.महाराष्ट्र टाईम्स/दै.हमारा महानगर या वर्तमानपत्रकामध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये टेंडर क्र. **PMC/ZONE3/2026-27/SINHGAD/23** मधील अटी व शर्थी प्रसिद्ध झालेल्या आहेत. सदर टेंडर क्र. **PMC/ZONE3/2026-27/SINHGAD/23** साठी प्रसिद्ध झालेल्या अटी व शर्थी कायम ठेवण्यात येत असून त्या सोबत मा.अति.महापालिका आयुक्त यांचे मान्यतेनुसार विशेष अटी व शर्थी लागू राहतील. सदर अटी व शर्थी समाविष्ठ करणेत आलेल्या आहेत. बाकी मजकूर पुर्वी जाहिर केल्याप्रमाणे कायम आहे.

उप आयुक्त
परिमंडळ क्र.३ कार्यालय
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र.०६-DC-३-२०२६-२७

पुणे महानगरपालिका, उपआयुक्त परिमंडळ.२ यांचे कार्यालय
पं.ज.ने.सांस्कृतिक भवन,घोलेरोड,शिवाजीनगर,पुणे-४११००५
जा.क्र.उआप२/ई-.ऑफिस क्र- 6785 दिनांक 23/02/२०२6

## Pre-Monsoon इतिवृत्त

विषय :- पावसाळापुर्व (Pre-Monsoon) कालावधीमध्ये पुणे शहरातील अस्तित्वातील नाला, पावसाळी वाहिन्या, मलवाहिन्या साफसफाई विषयक कामकाजाबाबत.

संदर्भ :- मलनिःसारण विभाग जा.क्र.CESD/६५०० दि. २७/०१/२०२६ रोजीचे पत्र.

संदर्भांकित पत्रान्वये दि. ३०/०१/२०२६ रोजी जुना जी.बी.सभागृह येथे मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी.यांचे अध्यक्षतेखाली पावसाळापुर्व (Pre-Monsoon) कालावधीमध्ये पुणे शहरातील अस्तित्वातील नाला, पावसाळी वाहिन्या, मलवाहिन्या साफसफाई विषयक कामकाजाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीकरिता मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, मलनिःसारण विभाग, उप आयुक्त परिमंडळ क्र. १ ते ५ आणि त्या अंतर्गत येत असलेल्या १५ क्षेत्रीय कार्यालयांचे महापालिका सहायक आयुक्त सदर बैठकीत उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त यांचे उपस्थितीत सदर विषयाबाबत चर्चा करण्यात आली व सर्वानुमते ठरवून खालील प्रमाणे निर्देश दिले आहेत.

| अ.क्र. | चर्चेतील मुद्दे | निविदा प्रक्रिया राबविणेकरिता वापर करावयाच्या अटी व शर्ती बाबत निर्देश. |
|---|---|---|
| १. | मलवाहिन्यांच्या देखभाल दुरुस्ती विषयक कामासाठीचे निविदा अटी व शर्ती | १) मलनिःसारण देखभाल व दुरुस्ती विभागाकडील व १५ क्षेत्रिय कार्यालयाकडील अस्तित्वातील मलवाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती विषयक कामाकरीता निविदा अटी शर्ती मध्ये खालील नमुद तक्त्यानुसार यंत्रसामुग्री स्वतःच्या मालकीची अथवा नोटरीकृत भाडेतत्वावर करारनामा (स्वसाक्षांकित) व सुरक्षासाधने स्वतःच्या मालकीची असणे आवश्यक असणार आहे. |

| | सुरक्षा साधने PPE Items | स्वतःच्या मालकीची (नग) |
|---|---|---|
| a | Reflecting Jacket | ५ |
| b | Safety helmet | ५ |
| c | Normal face mask | ५ |
| d | Hand gloves (pair) | ५ |
| e | Safety Gumboots (pair) | ५ |
| f | Safety body clothing | ५ |

| | सुरक्षा साधने Safety Gear items | स्वतःच्या मालकीची (नग) |
|---|---|---|
| a | Safety Tripod Set | १ |
| B | Nylon Rope ladder | १ |
| c | Blower with Air Compressor | १ |
| d | Gas Monitor (4 Gases) | १ |
| e | Full body Wader Suit | २ |
| f | Gas Mask | २ |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| g | Breathing Apparatus | २ |
| h | Safety body Harness | २ |
| i | Air Line Breathing Apparatus | १ |

| यंत्रसामग्री Other Machinery and Equipment Holding | | स्वतःच्या मालकीची अथवा नोटरीकृत भाडेतत्वावर करारनामा (स्वसाक्षांकित) नग |
|---|---|---|
| a | Sewer Inspection Camera Apparatus | १ |
| b | Hydro Jetting Machines | १ |
| c | Power Bucket Machines | २ |
| d | Power rodding aparatus | ३ |
| e | Hydraulic Sewer Root cutter | ५ |

२) सदरील कामे अत्यावश्यक असल्याने या कामांसाठी पुणे महानगरपालिकेमध्ये एका पात्र ठेकेदारास जास्तीत जास्त तीन (३) कामे अनुज्ञेय करण्यात येतील. जाहिराती मधील निविदा क्रमांकानुसार निविदा उघडण्यात येतील.

३) ड्रेनेज लाईन व चेंबरची साफसफाई करताना मशिनरीचा उपयोग करणे अनिवार्य आहे. ज्या ठिकाणी मनुष्यबळाने साफसफाई करणे आवश्यक असेल त्या ठिकाणी खात्याची पूर्वपरवानगी घेऊन सफाई कर्मचाऱ्यास ठेकेदाराकडून सुरक्षा उपकरणे उपलब्ध करून देऊन त्यांचा जागेवर वापर करून काम करून घेणे ठेकेदारास बंधनकारक आहे. सुरक्षा उपकरणे न वापरता चेंबर व ड्रेनेज लाईनची साफसफाई करताना सफाई कर्मचाऱ्यास काही अपघात झाल्यास THE PROHIBITION OF EMPLOYMENT AS MANUAL SCAVENGERS AND THEIR REHABILITATION Act 2013 CHAPTER 1 Section 2 (1)व (d) CHAPTER III Section 7 नुसार याची सर्व जबाबदारी ठेकेदाराची असणार आहे. तसेच CHAPTER III Section 9 नुसार ठेकेदार शिक्षेस पात्र राहणार आहे.

४) एल १ पात्र ठेकेदाराने मशीनरीजचे गुणवत्ता योग्य प्राधिकरणाकडून तपासून घेणे व खात्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र कार्यादेशा आधी सादर करणे बंधनकारक राहील.

| | | |
|---|---|---|
| २. | नाला साफसफाई करणे निविदा अटी शर्ती | 1) साफसफाई मध्ये काढलेला गाळ / राडारोडा त्वरीत उचलणे व योग्य ठिकाणी निचरा करणे.<br>2) सदर कामाअंतर्गत करण्यात येणा-या साफसफाई बाबतचे Latitude/Longitude सहित छायाचित्रे आणि खात्याने दिलेल्या नमूना तक्त्यामध्ये दैनंदिन अहवाल सादर करणे बंधनकारक आहे.<br>3) ठेकेदाराने रात्रपाळीमध्ये खात्याच्या आवश्यकतेनुसार काम करणे बंधनकारक आहे. |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | | 4) सदरील कामे अत्यावश्यक असल्याने या कामांसाठी पुणे महानगरपालिकेमध्ये एका पात्र ठेकेदारास जास्तीत जास्त तीन (३) कामे अनुज्ञेय करण्यात येतील जाहिराती मधील निविदा क्रमांका नुसार निविदा उघडण्यात येतील<br>5) ड्रेनेज लाईन व चेंबरची साफसफाई करताना मशिनरीचा उपयोग करणे अनिवार्य आहे. ज्या ठिकाणी मनुष्यबळाने साफसफाई करणे आवश्यक असेल त्या ठिकाणी खात्याची पूर्व परवानगी घेऊन सफाई कर्मचाऱ्यांस ठेकेदाराकडून सुरक्षा उपकरणे उपलब्ध करून देऊन त्यांना जागेवर वापर करून काम करून घेणे ठेकेदारास बंधनकारक आहे. सुरक्षा उपकरणे न वापरता चेंबर व ड्रेनेज लाईनची साफसफाई करताना सफाई कर्मचाऱ्यास काही अपघात झाल्यास THE PROHIBITION OF EMPLOYMENT AS MANUAL SCAVENGERS AND THEIR REHABILITATION Act 2013, CHAPTER I Section 2 (1) (d) व CHAPTER III Section 7 नुसार याची सर्व जबाबदारी ठेकेदाराची असणार आहे. तसेच CHAPTER III Section 9 नुसार ठेकेदार शिक्षेस पात्र राहणार आहे.<br>6) उपलब्ध कामासाठी किमान एकुण जेसीबी संख्या ४ असणे आवश्यक आहे त्यापैकी स्वतःच्या मालकीचे २ व भाड्याने २ उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.<br>7) उपलब्ध कामासाठी किमान एकुण पोकलेन संख्या 2 असणे आवश्यक आहे त्यापैकी स्वतःच्या मालकीचे 1 व भाड्याने 1 उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.<br>8) उपलब्ध कामासाठी किमान एकुण डंपर संख्या ४ असणे आवश्यक आहे त्यापैकी स्वतःच्या मालकीचे २ व भाड्याने २ उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.<br>9) किमान लेबर टिम 5 उपलब्ध करून देणे आवश्यक आहे त्यामध्ये एका टिम मध्ये 4 असे किमान एकुण 20 लेबर कार्यरत असणे आवश्यक आहे तसेच आवश्यकत्या ठिकाणी बॉबकॅट मार्फत साफसफाई करणे बंधनकारक राहील.<br><br>10) लेबर लायसन्स, किमान वेतन कायदा ESI, PF Pay Slip, online Payment in bank इ. पुर्तता करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.<br>11) नाला साफसफाई काम करतेवेळी ड्रेनेज लाईन्स चेंबर, MSEB, पाण्याची लाईन, MNGL इ. युटिलीटी सर्व्हिसेसचे नुकसान झाल्यास ते स्वखर्चाने तातडीने दुरुस्ती करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.<br>12) जेसीबी, डंपर, पोकलेन इ. मशिनरी यांचे डेली रजिस्टर ठेवणे तसेच कामाचे जीआयएस फोटो प्रत्येक आठवड्याला सादर करणे बंधनकारक राहील.<br>13) मशिनरींची मुळ कागदपत्रे (RC रजिस्ट्रेशन, पीयुसी इ). निविदा भरते वेळी सादर करणे आवश्यक बंधकनकारक राहील.<br>14) डंपर, मशिनरी इ. ला GPS यंत्रणा बसविणे आवश्यक राहील व त्याचा दैनंदिन अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.<br>15) तसेच या विशेष अटी व शर्ती बरोबरच CVC Guideline नुसार सामान्य अटी व शर्ती या निविदेचा भाग राहील. |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| २. | पावसाळी लाईन साफसफाई करणे निविदा अटी शर्ती | १) सदर ठेकेदाराकडे स्वत:च्या मालकीची अथवा नोटरीकृत भाडेतत्वावर करारनामा (स्वंसाक्षांकित) केलेली किमान ३ डंपरची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे<br>२) पावसाळी लाईनचे चेंबर मध्ये साफसफाई करताना चेंबरच्या दोन्ही बाजूस किमान दोन मिटर लांबीची पावसाळी लाईन सफाई या आयटम मध्ये अंतर्भुत आहे<br>३) पावसाळी लाईनची साफसफाई नंतर या बाबत खात्यास आवश्यक वाटेल त्या ठिकाणी Mirror टेस्ट देऊन लाईन साफ झालेबाबत खातेस जमा करणे बंधनकारक आहे<br>४) साफसफाई मध्ये काढलेला गाळ/राडारोडा त्वरीत उचलणे व योग्य ठिकाणी निचरा करणे<br>५) आर.सी.सी. झाकणचे छिद्र पुर्णता मोकळेसाफ करणे बंधनकारक आहे<br>६) सदर कामाअंतर्गत करण्यात येणाऱ्या चेंबर साफसफाई लाईन साफसफाई इ बाबींचे Latitude/Longitude सहित छायाचित्रे आणि खात्याने दिलेल्या नमूना नकाशामध्ये दैनंदिन अहवाल सादर करणे बंधनकारक आहे<br>७) ठेकेदाराने रात्रपाळीमध्ये खात्याच्या आवश्यकतेनुसार काम करणे बंधनकारक आहे.<br>८) सदर काम अत्यावश्यक असल्यानेया कामांसाठी पुणे महानगरपालिकेमध्ये एका पात्र ठेकेदारास जास्तीत जास्त तीन (३) कामे अनुज्ञेय करण्यात येतील. जाहिराती मधील निविदा क्रमांकानुसार निविदा उघडण्यात येतील.<br>९) दररोजचे पावसाळी लाईन व चेंबरचे काम जीआयएम मॅपवर दर्शविणे आवश्यक त्यासाठी ठेकेदाराने समन्वय साधून काम करणे बंधनकारक आहे. |

तरी वरील तीनही कामांची निविदा प्रक्रिया तातडीने राबवावी तसेच निविदा प्रक्रिया राबविताना वरीलप्रमाणे अटी व शर्ती यांचा समावेश करावा असे ठरले.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (माधव जगताप)<br>उप आयुक्त<br>(परिमंडळ क्र.१)<br>पुणे महानगरपालिका | (संतोष वारुळे)<br>उप आयुक्त<br>(परिमंडळ क्र.२)<br>पुणे महानगरपालिका | (प्रसाद काटकर)<br>उप आयुक्त<br>(परिमंडळ क्र.३)<br>पुणे महानगरपालिका | (अरविंद माळी)<br>उप आयुक्त<br>(परिमंडळ क्र.४)<br>पुणे महानगरपालिका | (नितीन मोरे)<br>उप आयुक्त<br>(परिमंडळ क्र.५)<br>पुणे महानगरपालि |

| | |
|---|---|
| (जगदीश खानोरे)<br>मुख्य अभियंता<br>मलनि:सारण विभाग<br>पुणे महानगरपालिका | (पृथ्वीराज बी.पी.)<br>अतिरिक्त महापालिका आयुक्त<br>पुणे महानगरपालिका |

Scanned with OKEN Scanner